**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.३ मार्च ते ८ मार्च २०२५ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.**
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.No./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४४ ■ सोमवार ३ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

**उत्कृष्ट क्वालिटी**
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
**सागर ड्रायफ्रुट**
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# मुंबईत आजपासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

## मंत्री मुंडे, कोकाटे अन् गृहखाते विरोधकांच्या रडारवर



**मुंबई, दि.२- राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि.३ मार्चपासून मुंबईत सुरू असून विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार आपला पहिला अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडणार आहे. विरोधकांचे संख्याबळ फारसे नसले तरी सरकारला अडचणीत आणण्यासाठी अनेक स्फोटक मुद्यांचा दारूगोळा विरोधकांच्या हाताशी असल्याने राज्यभराचे अधिवेशनाकडे लक्ष लागले आहे.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, कृषी साहित्य खरेदीतील कथित भ्रष्टाचार यावरून अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका लाटल्यामुळे दोन वर्ष कारावासाची शिक्षा झा-लेले कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर आक्रमक भूमिका घेण्याची तयारी विरोधकांनी केली आहे. पुणे स्वारगेट बलात्कार प्रकरण व दोन मंत्र्यांची बेताल वक्तव्ये, लाडकी बहिण योजनेतील ९ लाख बहिणींना अपात्र ठरवणे, २१०० रुपये मानधन देण्याच्या आश्वासनाची पूर्तता या मुद्यांवरही सरकारला घेरण्याची विरोधकांची रणनीती आहे. यामुळे हे अधिवेशन गाजणार अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारनेही विरोधकांच्या प्रत्येक हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याची चोख तयारी **(पान ४ वर)**

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

**मुंबई, दि.२- सोमवारपासून अर्थात तीन मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारकडून आयोजित करण्यात येणाऱ्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. विरोधकांकडून सरकारला घेरण्यासाठी तयारी केली आहे. लाडकी बहीण, शेतकरी कर्जमाफी, संतोष देशमुख हत्याकांड, कृषी विभाग घोटाळा, प्रशांत कोरटकर प्रकरणावरून सरकारला घेरणार, असे पत्रकार परिषदेतून दिसून आले.**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील तीनही पक्षांतील नेत्यांची बैठक विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अजिंक्यतारा बंगल्यावर पार पडली. यावेळी आमदार भास्कर जाधव, आमदार भाई जगताप, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार सुनील प्रभू, आमदार आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीतील अन्य नेते उपस्थित होते. अंबादास दानवे म्हणाले, **(पान ४ वर)**

## माकपच्या राज्य सचिव पदी कॉ.अजीत नवले



परभणी, दि.२- गेल्या तीन दिवसापासून सेलू येथे सुरू असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य अधिवेशनाचा समारोप शनिवारी पार पडला. या अधिवेशनात पक्षाच्या राज्यसचिवपदी कॉ.अजीत नवले यांची निवड करण्यात आली आहे. सेलू येथे गुरुवारपासून माकपचे राज्य अधिवेशन सुरू होते. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, लाल निशाण पक्षाचे भीमराव बनसोड, भाकपचे राज्य सचिव राम बाहेती, अजीत पाटील, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस किशोर ढमाले आदी यावेळी उपस्थित होते.



## ना.रक्षा खडसेंच्या मुलीची छेडछाड सात जणांविरुद्ध पोक्सोंतर्गत गुन्हा

**मुक्ताईनगर, दि.२- रक्षा खडसेंच्या मुलीच्या छेडछाड प्रकरणी अनिकेत भोईला पोलिसांनी अटक केली आहे. रक्षा खडसेंच्या अल्पवयीन मुलीची आणि तिच्या मैत्रिणींची त्याने छेड काढली होती. त्या प्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली आहे. महाशिवरात्रीच्या यात्रेत रक्षा खडसे यांची मुलगी गेली होती. त्यावेळी ही घटना घडली आहे.**

मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी गावात महाशिवरात्री निमित्त आदिशक्ती मुक्ताबाईची यात्रा भरते. या **(पान ४ वर)**

## पंच्यान्नव लाख रुपये फेडूनही सावकारी कर्जाचा जाच तापी नदीत करंजगव्हाणमधील इसमाची आत्महत्या

**शिरपूर दि.२ (का.प्र.)- मे २०२४ मध्ये शिरपूरजवळ सावळदे येथील तापी नदीत उडी टाकून दगडू दिनकर धामणे (वय ६१, रा.करंज गव्हाण ता.मालेगाव) यांनी आत्महत्या केली होती. त्यांचा भाऊ प्रवीण धामणे याने एक मार्चला दिलेल्या फिर्यादीनंतर, सावकारी जाचाला कंटाळून दगडू धामणे यांनी जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. विशेष म्हणजे ९५ लाखांपेक्षा जास्त रकमेचे व्याज देऊनही संशयितांनी धामणे यांचा छळ केला होता. याप्रकरणी मालेगाव व धुळे तालुक्यातील एकूण दहा सावकारांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

प्रविण धामणे यांच्या फिर्यादीनुसार, दगडू धामणे यांनी मालेगाव व धुळे तालुक्यातील खाजगी सावकारांकडून कर्ज घेतले होते. कर्जाचे निव्वळ व्याज म्हणून संशयितांना त्यांनी वेळोवेळी एकूण ९५ लाख २६ हजार रुपये अदा केले. मात्र पैशांच्या वसुलीसाठी संशयितांकडून त्यांचा छळ सुरु होता. त्याला कंटाळून दगडू धामणे यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. संशयित शरद धर्माजी भदाणे (रा.वजरिखेडे ता.मालेगाव), भावडूनथा ठाकरे, योगेश अभिमन शिंदे (दोघे रा.करंज गव्हाण), पोपट चिंधा शिंदे, ज्ञानेश्वर देविदास डापसे (दोघे रा.कुकाणे ता.मालेगाव), आशीष मानसिंह ओळख, कृष्णा किशोर ओळख, आधारसिंह श्यामसिंह ओळख (तिघे रा.हाताणे ता.मालेगाव), राहुल विजय चौधरी (रा.लामकानी ता.धुळे) व तुकाराम कोंडीराम फरस (रा.टोकडे ता.मालेगाव) यांच्याविरोधात शहर पोलिसांनी सावकारीसह आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला असून सहायक निरीक्षक संदीप पाटील तपास करीत आहेत.

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा समाजाने लाभ घ्यावा : अध्यक्ष ललित गांधी

**धुळे, दि.२- जैन समाजाच्या सर्व घटकांचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती समाजातील नागरिकांनी घेऊन त्यांचा लाभ घ्यावा. असे प्रतिपादन जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोग सदस्य ललित गांधी यांनी केले.**



जिल्हाधिकारी कार्यालयात गांधी यांच्या अध्यक्षतेखाली भगवान महावीर जन्म कल्याणक २५५० महामहोत्सवानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ तसेच आढावा बैठक संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, जिल्हा नियोजन अधिकारी छ. रा. कनगरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनिष पवार, श्री.चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष प्रमोद जैन, पदमप्रभू दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष भरत जैन, श्री.शांतीनाथजी दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष प्रविण ठोलीया, मांगीतुंगीचे उपाध्यक्ष ड. महेंद्रकुमार जैन, कविराज जैन, पवनभाई पाटणी, जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे कार्यकारणी सदस्य फुलचंद जैन, किशोरभाई शाह, नवकार मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुनिज मुथा आदी उपस्थित होते.

श्री. गांधी म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने जैन समाजाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळात जैन समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजनांचा समावेश केलेला आहे. त्यात व्यक्तिगत विकासासाठी, व्यापार उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या योजना, महिला बचतगटांना प्रोत्साहन योजना, महिलांना व्यापार उद्योगांमध्ये प्रोत्साहित करण्याच्या योजना, शिक्षणामध्ये उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशीप योजना अशा विविध योजनांचा या महामंडळाच्या कार्यकक्षेत समावेश केलेला आहे.

याबरोबरच जैन धर्मियांच्या प्राचीन तीर्थक्षेत्रांचे संवर्धन, जीर्णोद्धार योजना या महामंडळामध्ये आहेत. तसेच प्राचीन जैन ग्रंथसंपदेच **(पान ४ वर)**



## शिरपूर तालुक्यातील चिलारे ते सुळे अतिक्रमीत रस्ता झाला मोकळा

**धुळे, दि.२- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या संकल्पनेनुसार राज्यात १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करण्यात आला आहे. या १०० दिवस कृती आराखड्याची अंमलबजावणी जिल्हा प्रशासनामार्फत सुरु आहजे. शिरपूर तहसिल कार्यालयामार्फतही या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार शिरपूर तालुक्यातील मौजे चिलारे ते सुळे ३ किलोमीटरचा अतिक्रमीत रस्ता शेतकऱ्यांसाठी मोकळा करण्यात आला आहे. अशी माहिती तहलिसदार महेंद्र माळी यांनी दिली आहे.**

मौजे चिलारे ते सुळे ३ किलोमीटरचा हा अतिक्रमीत रस्ता मोकळा झाल्यामुळे साधारण: ३५ शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल ने-आण करण्यासाठी लाभ होणार आहे. हा रस्ता मोकळा करण्याचे काम तहसीलदार महेंद्र माळी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी शितल गिरासे, दहिवद, तलाठी देवेंद्र ईशी तसेच गावचे सरपंच अमोल पावरा, उपसरपंच राजधर पावरा, रोहिदास गिरे, रणजीत पावरा, सायसिंग पावरा, कोमलसिंग पावरा, रंजीत पावरा, गुलाब सिंग मानसिंग पावरा व गावातील ग्रामस्थांच्या उपस्थित करण्यात आला.

## विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणी प्रिन्सिपल, वर्गशिक्षकाविरोधात गुन्हा

**शहादा, दि.२ (का.प्र.)- तालुक्यातील सुलतानपूर येथे तात्पुरते स्थलांतर झालेल्या एकलव्य रेसिडेन्शियल स्कूल या केंद्रीय आश्रम शाळेतील तेरा वर्षीय विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणात स्कूलचे प्रिन्सिपल व वर्गशिक्षक या दोघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. स्कूलचे प्राचार्यांना दोन दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून वर्गशिक्षक अद्याप फरार आहे.**

मोहिदा येथील एकलव्य रेसिडेन्सी स्कूल या केंद्रीय आश्रम शाळेचे तात्पुरते स्थलांतर सुलतानपूर येथील शासकीय आश्रम शाळेत करण्यात आले आहे. या शाळेच्या मुलीच्या वसतिगृहातील तिसऱ्या मजल्यावरील सीवन या खोलीमध्ये दि.१ मार्च रोजी उषा



वसावे या विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती. तिच्या आत्महत्येस शाळेचे प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप पालकांसह नातेवाईकांनी केला होता. या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात मयत मुलीचा भाऊ राजेंद्र लेहाऱ्या वसावे याच्या फिर्यादीवरून प्राचार्य विनोद पाटील व वर्गशिक्षक नाव माहित नाही अशा दोघांविरोधात विद्यार्थिनीला वारंवार मानसिक त्रास देऊन आत्महत्येसप्रवृत्त केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे करत आहेत. दरम्यान संशयित आरोपींपैकी प्राचार्य विनोद पाटील यांना पोलिसांनी अटक केली असून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तर वर्गशिक्षक फरार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, मयत विद्यार्थीनीची नंदुरबार येथील वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय येथे शवचिकित्सा करण्यात आल्यानंतर शनिवारी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. रविवारी सकाळी तिच्या पार्थिवावर धडगाव तालुक्यातील अट्टी पोस्ट सुरवाणी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



## कवयित्री सोनाली मराठेंच्या हिंदी काव्य संग्रहाचे धुळ्यात प्रकाशन

**धुळे, दि.२- शहरातील जेष्ठ कवयित्री सोनाली मराठे यांच्या लिखित खामोशिया या हिंदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्राचे माहिती संचालक हेमराज बागुल यांच्या हस्ते करण्यात आले**

श्रीमती सोनाली मराठे यांच्या आतापर्यंत मराठी, हिंदी, नेपाळी, भोजपुरी, पंजाबी, इंग्रजी भाषेत अनेक कविता अनुवादित करण्यात आले आहेत. त्यांच्या परिवर्तन साहित्य मंच दिल्लीचे वतीने कविता युट्युबवर कविता सादर करण्यात आले आहेत. दि.एक मार्च रोजी महाराष्ट्राचे माहिती संचालक हेमराज बागुल, पुण्याच्या अतिरिक्त जीएसटी आयुक्त वैशाली पतंगे, धुळे जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंग तवर, हिंदीतील ज्येष्ठ साहित्यिक लेखक डॉ.संतोष पटेल व पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या उपस्थितीत खामोशिया या हिंदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. एक मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता शहरातील कोतवाल हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मान्यवरांनी खामोशिया हिंदी कविता संग्रहास शुभेच्छा दिल्या. विजयराव अहिरराव, ॲड.ऋतुराज वाघ, ॲड.वैष्णवी विजय अहिरराव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## इन्शाअल्लाह कादंबरी अभिवाचनास श्रोत्यांच्या प्रतिसाद शहाद्यात श्री.पी.के.आण्णा पाटील फाऊंडेशनचा उपक्रम

**शहादा, दि. २ (का.प्र.)- राजहंस प्रकाशनादद्वारे प्रकाशित अभिराम भडकमकर लिखित इन्शाअल्लाह या समाजातील धार्मिक घुसळणीवर आधारित कादंबरीचा अभिवाचन कार्यक्रम येथील महात्मा गांधी सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमास श्रोत्यांच्या मोठा प्रतिसाद लाभला.**

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ व श्री.पी.के. अण्णा पाटील फाउंडेशन शहादा यांच्या संयुक्त विद्यमाने पुरुषोत्तम व्याख्यानमालेअंतर्गत इन्शाअल्लाह कादंबरीच्या अभिवाचनाचा कार्यक्रम शनिवारी सायंकाळी




संपन्न झाला. श्रोत्यांनी तुडुंब भरलेल्या सभागृहात संपन्न झालेल्या अभिवाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील हे होते. या अभिवाचन कार्यक्रमात स्वतः लेखक अभिराम भडकमकर, कलावंत स्वाती चिटणीस, सचिन सुरेश व सलीम मुल्ला हे सहभागी झाले होते. कार्यक्रमास, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. **(पान ४ वर)**

## नवापूरला अपघात एक जागीच ठार

नंदुरबार, दि.२ (प्रतिनिधी)- सावरट गावाच्या हद्दीत धुळे सुरत महामार्गावरील उडडाणपुलाच्या उतारावर १ मार्च रोजी रात्री ९.३०च्या सुमारास इंडीको गाडीने समोरुन येणाऱ्या मोटारसायकलीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दिलूभाई काथुडयाभाई गामित ६१ हे ठार झाले. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. पार्थभाई दिलीपभाई चौधरी रा डेडीयापाडा जि तापी हा चालक इडीको वाहन भरधाव नेत असतांना समोरुन येणारे दुचाकी वाहन जी जे १८ ई ७५८३ याला धडकदिली.यात अपघातात दिलूभाई गामित हा ठार झाला.या प्रकरणी कौशिकभाई गामित यांनी पोलिसांत फिर्याद दिल्याने नवापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## छत्रपतींची बदनामीकारक पोष्ट अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा

**नंदुरबा, दि.२ (प्रतिनिधी)- सोशल मिडीयावर दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोष्ट व्हायरल केल्याप्रकरणी नंदुरबार शहरातील एका विरोधात शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीवर गुन्हा दाखल करावा यासाठी शिव प्रेमीनी पोलीस ठाण्यात गर्दी केली.**

अठ्ठाविस फेब्रुवारी रोजी एकाने औरंगजेब यांची स्तुती करणारी पोष्ट केली होती. तसेच महापुरुषाचा अवमान करणारी पोष्ट इन्स्ट्राग्रॅमवर लोड केली होती. याप्रकरणी फिर्याद देण्यात आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत आक्षेपार्ह पोष्ट इन्स्ट्राग्रॅमवर लोड केल्याने शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली. त्यानंतर अल्पवयीन मुलास अटक करण्याची मागणी केली. शिवप्रेमींनी पोलिस ठाण्यात गर्दी केली होती. आरोपीला अटक **(पान ४ वर)**

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**शिंदखेडा, दि.२ (प्रतिनिधी) -धुळे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून आम्ही सर्व ग्राहक समस्यांवर तदसम विभागाकडे अर्ज पाठवून, पाठपुरावा करुन निराकरण करणार व ग्राहकांना हक्कांचे संरक्षण करणार असे प्रतिपादन जिल्हा पुरवठा अधिकारी महेश**



**शेलार यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. ग्राहक पंचायत महाराष्ट्र व इतर अशासकीय सदस्यांनी महेश शेलार यांचा सन्मान केला. प्रास्ताविक व इतिवृत्त वाचन सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत यांनी केले. अशासकीय सदस्यांतर्फे प्रास्ताविकात डॉ.अजय सोनवणे (नाशिक विभाग अध्यक्ष, ग्राहक पंचायत महाराष्ट्र) यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचा हेतु विशद करुन बनावट पनीर, विषारी बटाटा, मिरची पावडर, मसाला, हळद, दुध यातील भेसळ, कॉटन कॅडी (बुढ्ढी के बाल) वर बंदी, खाद्यपदार्थातील कृत्रिम रंग बंदी, अल्ट्रा प्रोसेसिंग अन्नात (जंकफुड) अतिसाखर, अतिमीठ, प्रिझरवेटीव्ह असते, फळे पिकविण्यासाठी कॉर्बाईड वापर, अजीनोमोटो या सर्व बाबीमुळे कॅन्सर, लिव्हर, किडनी विकार, ॲसिडीटी आदी होऊ शकतात, याबाबत अन्न व भेसळ विभागाने जनजागृती मोहिम, कारवाई करावी तसेच एचएसआरपी नंबरप्लेटस बाबत पुनर्विचार करावा, असेही सांगितले. प्रा.चंद्रकांत डागा (जिल्हा समन्वयक तथा जिल्हासंघटक) यांनी ग्राहक मध्यस्थ सेल सदस्यांना प्रशिक्षण द्यावे, ग्राहक मध्यस्थ सेलला केसेस द्याव्यात, धुळे येथे राज्य ग्राहक आयोगाचे परिक्रमा खंडपीठ व्हावे, अशासकीय सदस्यांना प्रशिक्षण द्यावे, जिल्हयातील दुचाकी व चारचाकी वाहनांवर फॅन्सी नंबरप्लेट हटविण्यात याव्या अशी मागणी केली. डॉ. अरुणकुमार छाजेड यांनी गुटखा चेतावणी चिन्ह मोठ्या आकारात असावे, डीजे,इतर ध्वनीप्रदूषण व रस्त्यांची समस्या मांडल्यात. राकेश मोरे **(पान ४ वर)**

| ०२ रोजा ०३ | |
|---|---|
| ३ मार्च २४ | ४ मार्च २४ |
| इफ्तार | सहेरी |
| ६.३८ | ५.३० |

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -78,300 रु.+3% GST
सोने- 24 K -85,500 रु.+3% GST
चांदी- 97,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



**चतुर्थ पुण्यस्मरण**
**कालकथित केशरबाई बाबुराव जगदेव**
(निधन दि.०३ मार्च २०२१)
चालतो आहोत तुमच्या संस्कारानुसार, जगतो आहोत तुमच्या आदर्शानुसार
यशस्वी आहोत तुमच्या आशिर्वादाने, आठवण मात्र सदैव असते म्हणून
आपल्या पावन स्मृतिस अभिवादन..!
-------: शोकाकुल :-------
आयु.ॲड.प्रशांत बाबुराव जगदेव (मुलगा) सेवानिवृत्त AGM (HR) — आयु.प्रमिला प्रशांत जगदेव (सून)
आयु.भिमराव बाबुराव जगदेव (मुलगा) — आयु.योगेश भिमराव जगदेव (नातू)
आयु.अरुणा धुडकू वाघ (मुलगी) — आयु.मिनाक्षी ऋषिकेश जगदेव (सून)
आयु.गंगाराम बाबू नगराळे (जावई) — आयु.बेबाबाई गंगाराम नगराळे (मुलगी)
आयु.प्रमोद प्रशांत जगदेव PI, मुंबई (नातू) — आयु.रोहिणी प्रमोद जगदेव (नातसून)
आयु.प्रविण आनंदराव पानपाटील (नातजावई) — आयु.हर्षदा प्रविण पानपाटील (नात)
आयु.जयेश प्रशांत जगदेव (युनियन बँक नगर) (नातू) — आयु.ॲड.सोनल जयेश जगदेव नोटरी GOV (नातसून)
आयु.गौतम भिमराव जगदेव (नातू) — आयु.रत्नाबाई गौतम जगदेव (नातसून)
आयु.ऋषिकेश नानाभाऊ जगदेव (नातू) — आयु.हर्षदा ऋषिकेश जगदेव (नातसून)
हंसिणी, तारुष, रिधम जगदेव (पणतू) — हर्षला, प्रांजली, टिना वाघ (नाती)
अद्वय, कनिष्क पानपाटील (पणतू) — रविंद्र, वंदनाबाई गंगाराम नगराळे (नातू/नात)
मु.टेंभे बु।। पो.सारंगखेडा ता.शहादा जि.नंदुरबार

## आपला महाराष्ट्र

# राज्य परिवहन महामंडळाचे नष्टचर्य

राज्य परिवहन महामंडळाची लाल परी बस, किंवा शिवशाही, शिवनेरी बस, महाराष्ट्रातील सर्वसामान्य मराठी जनतेची वाहिनी म्हणून प्रसिद्ध असली तरी या महामंडळाचे नष्टचर्य काही संपता संपत नाही. स्वातंत्र्य मिळायच्या आधी. देशात सर्वत्र खाजगी बसेसचा सुकाळ होता. ह्या बसेस पेट्रोलवर चालत असत. त्याही आधी कोळशावर चालत असत. चिमठाण्याचा जो खजिना १९४४ साली लुटला गेला ती बस कोळशापासून बनलेल्या वाफेवर चालत होती. तिचा वेग कमी असल्यानेच क्रांतिकारकांना त्यात दरोडा टाकणे शक्य झाले. बस वेगात असती तर हा खजिना लुटला गेला नसता. यानंतर काही काळातच पेट्रोलवर चालणाऱ्या बसेस आल्या. नंतर डिझेलवर चालणाऱ्या आल्या. आज डिझेलवर तसेच गॅसवर बसेस चालतात. आणि आता तर इलेक्ट्रिक बसेस निघाल्या आहेत. पहिली लोकसभा अस्तित्वात आल्यानंतर देशभरातील राज्या राज्यात राज्य परिवहन महामंडळे स्थापन करण्यात आली. खाजगी बस उद्योग संपुष्टात आला. वाहतुकीचे राष्ट्रीयकरण झाले. तो सरकारचा अंगीकृत व्यवसाय ठरला. जनतेच्या सेवेसाठी, कमीत कमी खर्चात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे सुविधा जनक वाहन म्हणून राज्य परिवहन अर्थात य एष्टीकडे बघितले जाते. महाराष्ट्रात एसटीचे फार मोठे जाळे आहे. नवनव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होत आहेत. अधून मधून या सेवेचे खाजगीकरण करण्याच्या वावड्या उठत असतात. मध्यंतरीच्या काळात एका वकिलाच्या नादी लागून एसटीच्या काही कामगार संघटनांनी एसटी संपवण्याचा घाट घातला होता. सुदैवाने सरकारच्या भूमिकेमुळे हे महामंडळ वाचले. कामगारांना संबंधित तथाकथित नेत्याचा फोलपणा देखील लक्षात आला. पण वाहवत जाणे हा माणसाचा स्वभाव असल्याने असे काहीतरी होते मात्र आपण एकूण व्यवस्थाच अडचणीत आणतो हे त्यांना कळत नाही. खाजगीकरणाच्या प्रवाहात असंख्य खाजगी बसेस पुन्हा रस्त्यावर धावू लागल्या. लक्झरी बस असे तिचे गोंडस नाव पडले. लोकांना या व्यवस्थेची की भुरळ पडली की लोकांनी स्वस्त आणि किफायतशीर वाहतूक व्यवस्था म्हणून ज्या एसटीकडे बघितले जाते तिच्याकडे पाठ फिरवली. सरकारच्या सवलतीच्या वर्षावामुळे थोडीशी गर्दी एसटीकडे वाढली. नंतरच्या काळात स्वस्त लोकप्रियतेसाठी सरकारने महिलांना ५० टक्के सवलत जारी केली. त्याचबरोबर वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना पूर्णपणे फुकट प्रवास सुरू केला. बरेच लोक तंबाखूची पुडी आणण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी एसटीने जातात. किंवा विरंगुळा म्हणून चहा पिण्यासाठी जातात आणि येतात. त्याचा परिणाम असा झाला की एसटी ची डोकेदुखी वाढली. ५० टक्क्यांच्या सवलतीमुळे महिलांची गर्दी वाढली. या गर्दीमुळे एसटीचे उत्पन्न वाढले. पण खर्चात घट झालेली नसल्याने परिवहन महामंडळ सतत तोट्यात येऊ लागले. काही चुकीचे निर्णय घेतल्यामुळे हजारो कोटींचा फटका एसटीला बसावा असेही काही घडले. त्यासंबंधीचा करार मुख्यमंत्र्यांनी संपुष्टात आणलेला आहे. त्यामुळे मोठ्या फटक्यातून एसटी वाचली. सुमारे २७- २८ पद्धतीच्या सवलती एसटीने विविध घटकांना दिल्या आहेत. त्या सर्वांची भरपाई राज्य सरकार करते. त्यामुळे एसटीच्या व्यवस्थापनाला फारशी चिंता करण्याचे कारण नाही. सरकारकडील रक्कम कधी वेळेवर येते तर कधी उशिरा मिळते. तेवढा सोयी गैरसोयीचा भाग सोडला तर एसटी आणि सरकारचे सवलती संबंधीचे आदान-प्रदान व्यवस्थित आहे. मात्र हेच सरकार एसटीकडून पथकर, आणि टोल टॅक्स च्या माध्यमातून हजारो कोटी रुपये वसूल करते. ही बाब अनाकलनीय वाटते. राज्य परिवहन हा सरकारचा अंगीकृत व्यवसाय आहे. त्या व्यवसायातून सवलती देताना सवलतीच्या रकमेची भरपाई करणे आणि त्याचवेळी त्याच माध्यमातून ती पुन्हा तोट्याच्या खाईत ढकलून देणे. हे सरकारचे धोरण भल्या भल्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे एसटीवर सुमारे ६४० कोटी रुपयांचा बोजा वाढला आहे.

परिवहन मंत्री असे म्हणतात की महिला, ज्येष्ठ नागरिक, आणि अन्य घटकांना देण्यात येणाऱ्या सवलतीमुळे एसटीचा तोटा वाढला आहे. खुद्द मंत्र्यांनीच अशा पद्धतीची मल्लिनाथी केल्यामुळे त्यांच्यावर अर्थातच टीका होऊ लागली. असे असले तरी एसटीच्या तोट्याचे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. यंदा केवळ दहा महिन्याच्या कालखंडात या तोट्यात ६४० कोटी रुपयांची भर पडलेली आहे. ऑगस्ट महिना ते दिवाळीपर्यंत एसटीला सुगीचा हंगाम असतो. त्यातबरोबरी होते. मात्र इतर वेळी भारमान कमी झाल्याने हा तोटा सतत वाढत असतो. २०२३ च्या मार्च महिन्यापासून महिला सन्मान योजनेच्या अंतर्गत ५० टक्क्यांची सवलत देण्यात आली त्या वर्षात सुमारे ११५ कोटी महिलांनी या योजनेचा लाभ घेतला तो खर्च ३५२७ कोटीहून अधिक आहे. त्याची पूर्ती राज्य सरकारकडून करण्यात येते. २०२४ पंचवीस या आर्थिक वर्षात आतापर्यंत ५४ कोटी महिलांनी एसटीने मोफत प्रवास केला असून त्यावर पंधराशे नऊ कोटी रुपये खर्च झाले. अशाप्रकारे दरमहा सुमारे दोन कोटी महिला या योजनेचा लाभ घेतात. त्यामुळे सवलतीची रक्कम १२५ ते १५० कोटी रुपये दर महा एवढी होते. सुमारे ५२ कोटी ज्येष्ठ नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेतला. त्यासाठी २६८२ कोटी रुपये खर्चाची रक्कम महाराष्ट्र शासनाने एसटीला अदा केली. चालू वर्षी या सवलतीची रक्कम ११२६ कोटी एवढी आहे. दरमहा शंभर ते १२० कोटी रुपये एवढी ही रक्कम असते. गेल्या ऑगस्ट महिन्यात एसटीला फक्त २२ कोटी रुपये एवढा नफा झाला. तेवढा अपवाद वगळता बाकीचे सर्व महिने तोट्यात आहेत. सरकारने ३८३५ कोटी रुपये एसटीला परत दिले आहेत. १५ टक्के भाडेवाढ केली असली तरी त्या पटीत सवलतीच्या रकमेत देखील वाढ होते आणि त्याची प्रति पूर्ती सरकारला करावी लागते. सरकार लोकप्रियतेसाठी, आणि नेहमी निवडणूक समोर ठेवून ह्या सवलतीची रक्कम देत आलेले आहे. सढळ हाताने अशा पद्धती- ने खैरात चालू असल्यामुळे सरकार केव्हाही अडचणीत येऊ शकते. लाडक्या बहिणी असतील किंवा इतर अनेक योजना असतील त्यासाठी आता सरकारला कर्ज काढावे लागते ही वस्तुस्थिती आहे. एवढा मोठा कर्जाचा बोजा, आस्थापनेवरचा खर्च, आणि इतर अनेक विकासाचे खर्च लक्षात घेता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था केव्हाही कोलमडून पडण्याच्या स्थितीत येऊन पोहोचणार आहे.

एसटी कडून सरकार २०४ कोटी रुपये एवढा पथकर दरवर्षी घेते. वरून पुन्हा टोल टॅक्स घेते. एकदा पथकर घेतला की नंतर टोल टॅक्स घेणे म्हणजे एसटीला भुर्दंड आहे. इतर वाहनांनाही आहे. पण आले सरकारच्या मना तेथे कोणाचे चालेना अशी अवस्था निर्माण झाली आहे.तेव्हा दोन पैकी एकाच कराची आखणी झाल्यास. एसटीला तोट्यातून बाहेर येण्यास मदत होईल. पण सरकार तसा विचार करत नाही. जाहिरातीच्या माध्यमातून एसटी कमाई करेल आणि त्यातून तोटा भरून काढेल असे सरकारचे म्हणणे पडते. त्याचवेळी एसटीच्या ज्या प्रचंड जागा आहेत त्याकडे आता व्यवसायिकांचा आणि सरकारमधील कारभाऱ्यांचा डोळा आहे. या जागांचे खाजगीकरण करून त्यातून पैसा उभा करण्याची पद्धत अवलंबिली जाणार आहे. एकदा ती अवलंबली म्हणजे तो उपाय संपला की मग काय करणार असा प्रश्न उभा राहणार आहे. त्यासाठी कायमच्या योजना अमलात आणाव्या लागतील. आणि एसटीमध्ये जी छिद्रे आहेत ती बुजवावी लागतील. अनावश्यक खर्चाला कात्री लावण्याचे सूतोवाच मंत्र्यांनी केले खरे पण नेमके अनावश्यक खर्च कोणते हे स्पष्ट केले नाही त्यामुळे संभ्रम आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन, सुट्टे भाग, टायर खरेदी, डिझेलचा खर्च, भाडेतत्त्वावर घेतलेल्या बसेसचा खर्च हा काही अनावश्यक खर्च नाही. उलट कमी पगारावर कर्मचाऱ्यांना धोपटून घेणे असला उद्योग सरकारने गेल्या काही वर्षांपासून सुरू केलेला आहे. ज्या शिवशाही बसेस भाडेतत्त्वावर घेतलेल्या आहेत त्यांचे खूप अपघात झाले. त्याचप्रमाणे अनैतिक कामांसाठी त्यांचा उपयोग होतो त्यामुळे एसटी बदनाम झाली हेही नसे थोडके.

# शहादा येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा तहसीलदार दीपक गिरासे यांचे हस्ते शुभारंभ



**शहादा, दि.२ (प्रतिनिधी)- राज्यशासनाच्या राष्ट्रीय बाल स्वाथ्य कार्यक्रम या महत्वाकांक्षी अभियानाच्या मोहीमेचा ऑनलाईन शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. शहादा तालुक्यात पण हा कार्यक्रम आज चावरा इंग्लीश मिडीयम स्कुल येथे तहसीलदार दीपक गिरासे यांच्या हस्ते संपन्न झाला.**

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र वळवी, गटशिक्षणअधिकारी डॉ.योगेश सावळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.मंगेश बर्डे, बाल विकास प्रकल्प अधिकारी सागर चौधरी, चावरा इंग्लिश मीडियम स्कूलचे फादर विजो, फादर सीजन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. राज्यातील ० ते १८ वयोगटातील बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, नगर विकास यांच्या समन्वयाने मोहीम राज्यस्तरावर राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत संपूर्ण राज्यातील शासकीय व निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील ० ते १८ वर्ष वयोगटातील बालक व किशोरवयीन मुला-मुलीची सर्वांगीण आरोग्य तपासणी करीता राष्ट्रिय बाल स्वास्थ्य कार्यक्रम विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत ० ते १८ वर्षा पर्यतच्या बालकांची, किशोरवयीन मुला-मुलींची तपासणी, आजारी आढळलेल्या बालकांवर तत्काळ उपचार, गरजू आजारी बालकांना संदर्भ सेवा देऊन उपचार, प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरवणे, सुरक्षित आरोग्यसाठी समुपदेशन यांचा समावेश आहे. १ ते ३१ मार्च पर्यंत संपूर्ण जिल्ह्यातील शाळा अंगणवाडी व आश्रम शाळेतील बलाकंची आरोग्य तपासणी -एटीपी करण्यात आले आहेत. सदर तपासणीत दरम्यान शारीरिक व्याधी आढळून आलेल्या बालकांना विविध संदर्ब सेवा शिबिरे आयोजित करून पुढील संदर्भसेवा देण्यात येवून राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत पुढील मोफत तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया शासनाकडून सामंजस्य करार करण्यात आलेल्या रुग्णालयात करण्यात येणार आहेत. तरी नंदुरबार जिल्हयातील सर्व ० ते १८ वर्षा पर्यतच्या बालकांची, किशोरवयीन मुला-मुलीची तपासणी, करून घ्यावी व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र वळवी, वैद्यकीय अधीक्षक डॉ.मंगेश बर्डे यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नोडल अधिकारी डॉ विनोद बाविस्कर, डॉ.जितेंद्र भंडारी, डॉ.राकेश पाटील, डॉ.शशिकांत पाटील, डॉ.श्याम ठाकुर, डॉ.भूषण पाटील, डॉ. सुनंदा भारती, डॉ.उज्वला भामरे, डॉ.चेतना पाटील, डॉ.सोनल भावसार, डॉ.कल्पना भंडारी, डॉ.अपर्णा खर्डे, औषध निर्माण अधिकारी पवन चौधरी, विशाल ठाकरे, निशा पावरा, परिचारिका भाग्यश्री सोनार, शितल राठोड, अनिता भंडारी, प्रियंका वळवी यांनी परिश्रम घेतले.



# शिरपूर येथे वनपट्टेधारक लाभार्थ्यांसाठी शिबिर संपन्न

**धुळे, दि.२- शंभर दिवस कृती आराखडा अंतर्गत वनपट्टे धारकांच्या सक्षमीकरणातंर्गत शिरपूर तालुक्यातील महादेव दोंदवडे येथील अतिदुर्गम भागात वनपट्टेधारक लाभार्थ्यांसाठी शिबिर संपन्न झाले.**

या शिबरात लाभार्थ्यांची प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची नोंदणी करण्यात आली तसेच नागरिकांच्या विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी शासनाच्या कृषी विभाग, महसूल, वन तसेच आदिवासी विकास विभागाच्या योजनेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नागरिकांना शिधापत्रिका, जात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येऊन विविध लाभाच्या योजनांचे अर्ज भरून घेण्यात आले. या शिबिरात उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, तहसिलदार महेंद्र माळी, लोकनियुक्त सरपंच श्रीमती संगीताबाई किसन पावरा, नायब तहसीलदार अधिकार पेंढारकर, मंडळ अधिकारी (होळनाथे) अनिल भामरे, ग्राम महसुल अधिकारी अनिल शिरसाठ, कृषी पर्यवेक्षक तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती तहसिलदार महेंद्र माळी यांनी दिली आहे.

# तीर्थक्षेत्र जयनगर येथे श्री हेरंब गणेश मंदिरात बुधवारी महाआरतीचे आयोजन

**जयनगर, दि.२ (प्रतिनिधी) - शहादा तालुक्यातील जयनगर येथे मागील महिन्यापासून दर बुधवारी श्री हेरंब गणेश मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात येत आहे. महाशिवरात्रीला बुधवारी हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या महाआरतीचा मान उपसरपंच तथा वनश्री ईश्वर संतोष माळी यांना लाभला. त्यांनी सपतकीक महाआरती भाग घेतला.**



शहादा तालुक्यातील जयनगर हे उजव्या सोंडेचा गणपती म्हणून प्रसिद्ध आहे. गावाला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला असून अंगारकी चतुर्थी, गणेश जयंती, संकष्टी चतुर्थीला हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. गावात श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. भागवत कथेत कथाकार प. पू. अनिलजी शर्मा व ग्राम पुरोहित सुनील जोशी यांच्या संकल्पनेतून दर बुधवारी महाआरतीचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे दर बुधवारी महा आरतीचे नियोजन तरूण भक्तांकडून करण्यात येणार आहे. त्यासाठी श्री हेरंब गणेश महाआरती समिती स्थापन करण्यात आलेली आहे. दर बुधवारी महाआरती होत असल्याने गावात धार्मिक सलोखा जोपासला जाणार आहे. गावातील तसेच परिसरातील भक्तांनी जास्तीत - जास्त अध्यात्माकडे वळावे म्हणून दर बुधवारी महाआरतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

# हस्ती गुरुकुल येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात; विजेत्या विद्यार्थ्यांना दिली बक्षिसे

**दोंडाईचा, दि.२- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत, हस्ती गुरुकुल दोंडाईचा येथे हस्ती शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला भारतीय भौतिकशास्त्रज्ञ- नोबेल पारितोषिक विजेते- डॉ. चंद्रशेखर वेंकट रामन, स्व. दादाजी हस्तीमलजी जैन, स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन, स्व. काकाजी कांतीलालजी जैन यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले.**



यात्रसंगी मुख्याध्यापक सदाशिव महाजन, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रश्नमंजूषा व भाषण स्पर्धेतील पुढील विजेते प्रथम :- प्रथमेश गिरासे, भावेश सोनवणे, व्दितीय - हिमांशु ठाकूर, हिमांशी पाटील, तृतीय - माहेश्वरी कणखर, कुणाल वाघ, भाषण स्पर्धा - प्रथम - युक्ता सनेर, व्दितीय प्रथमेश गिरासे, तृतीय दर्शना माळी वरील सर्व विजेत्यांना पारितोषिके देवून गौरविण्यात आले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी मनोगत व्यक्त केले.

विशेषतः प्रश्नमंजुषा स्पर्धा कार्यक्रम एकुण पाच फेरीत संपन्न झाला. प्रत्येक फेरीकरिता वेळेचे बंधनही टाकण्यात आले होते. याकरिता लॅपटॉप व प्रोजेक्टरच्या साहाय्याने मोठ्या पडद्यावर स्पर्धक विद्यार्थ्यांना विचारले जाणारे हिंदी विषया संबंधीत ज्ञानवर्धक प्रश्न व त्याच्याकरिता उत्तराचे चार पर्यायांमधुन अचूक उत्तराचा पर्याय निवड करण्याची सुविधा; स्पर्धेत सहभागी चारही गटातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी प्रश्नमंजूषा स्पर्धा स्थळी टि. व्ही. वरील ' कौन बनेगा करोडपती कार्यक्रमा सारखे वातावरण निर्माण झाले. यात्रसंगी चारही गटातील स्पर्धक विद्यार्थ्यांमध्ये प्रश्नमंजूषा स्पर्धेचे विजेते पद पटकावण्यासाठी अतिशय चुरस व उत्कंठा निर्माण झाली होती.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रविण माळी व संजय मोरे यांनी काम पाहिले.व सूत्रसंचालन रविंद्र कोळी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुवर्णा सोनवणे, स्वाती बागुल, आशा त्रिभुवन, क्रांती बोरसे, श्रद्धा कुवर, आरती माळी, पंकज जाधव, अमोल तांबे, धनिकलाल ठाकरे, दिनेश पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तरूणीची आत्महत्या

धुळे- भटाई देवी येथील एकोणावीस वर्षीय तरूणीने घरात ओढणीने गळफास घेवून आत्म हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, गावातील एकोणावीस वर्षीय तरूणी घरातील अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. नातेवाईकांनी खाली उतरवून तरूणीला खाजगी वाहनातून सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले असता डॉ.प्रकाश सुकळे यांनी तपासून मयत घोषित केले.

# वारंवार पैशांची मागणी तरुणाची आत्महत्या

नंदुरबार, दि.२ (प्रतिनिधी)- वारंवार पैशांच्या मागणीला कंटाळून तळोदा तालुक्यातील चिनोदा गावातील नरेंद्र अशोक पाटील या ३५ वर्षीय तरुणाने गळफास घेत आत्महत्या केली. शवविच्छेदन करतांना पाटील यांच्या खिशात चिठ्ठी सापडली असून चौघांकडून पैशांसाठी वारंवार धमकी येत असल्याने मी आत्महत्या करीत आहे,असे चिठ्ठीत नमूद करण्यात आल्याने कविता नरेंद्र पाटील, धर्मेंद्र सुरेश जाधव, संगिता सुरेश जाधव व भावना सुरेश जाधव या चौघांच्या विरोधात तळोदा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोउनि निलेश साळी यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.सोमावल बुद्रुक शेत शिवारात गुमानसिंग रुपसिंग पाडवी यांच्या आंब्याच्या शेतात झाडावर गळफास घेत आत्महत्या केल्याने तळोदा पोलिस ठाण्यात गिरीष दिगंबर पाटील या मजूराने फिर्याद दिली आहे.

# विष प्राशन केल्याने इसमाचा मृत्यू

धुळे- शिरपुर तालुक्यातील थाळनेर येथे सव्वीस वर्षीय इसमाने काही तरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, थाळनेर गावातील शेखर सुनिल धनगर (वय २६) यांनी शेतात काही तरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यांचा मृत्यू झाला.













### शब्दकोडे क्रमांक.२१०२



**आडवे शब्द :** १. विश्रांती ३. मुंबई नाशिक मार्गावरील एक घाट ५. धोका ,विश्वासघात ८. निगा ९. कहाणी १०. समान केलेला हिस्सा १२. सोन्याची बारीक तार १४. जकात १५. लहान १६. नूतन १९. हिंदीत -सावली २०. एक चतुर्थांश हिस्सा २१. घेराव २३. सरीता २५. रक्त २७.ताडाच्या झाडावरून मिळणारे पेय २८. दर्पण बनवण्यासाठी वापरतात तो महत्वाचा घटक ३०. वस्तू मोजण्याचे एकक ,जिन्नस, सामान ३३. युद्ध ३६. रान ३७. क्षण ३८. पळून गेलेला ४०. कैफ ४१. झाडाचे मूळ ४२. माहितीतला ४३. कडाक्याच्या थंडीतला गारवा ४५. काव्य रचणारा ४७. एकही अवाक्षर न बोलता केलेले व्रत ४८. संध्याकाळ ४९.लीन ५१. बाल बच्चे असलेला ५४. हिंदीत - ओठ ५६.प्रणयातील स्त्री ५७. शुष्क ५८. वालाच्या शेंगा ५९. एक चवदार मासा

**उभे शब्द :** १. रुची २. गुपित ३. मेहनत करणारा ४. पोपट ५. कंगवा ६. घड्याळाचे ठोके ७. भाजी ११. एक हजार किलो १३. एखादयाची हुबेहूब रेघाटलेली तसबीर १५. पन्नास आणि दोन मिळून तयार होणारी संख्या १६. आश्चर्य १७. दुर्ग १८. गोड सांजा २१. घरकाम करणारा पुरुष २२. जबरी चोरी २४. गरीब २६. हुलकावणी ,बतावणी २७.मोठ्या बहिणीस आपण आदराने हाक मारतो २९. रुचकर ३१. हिंदीत -मान ३२. सणसणीत हाणलेली थोबाडीत ३४. बांगलादेशची राजधानी ३५. ऐट ,मिजास रुबाब ३८. इज्जत ३९. गंगा नदीचे पवित्र पाणी ४२. सखोल माहिती ४४. जीवानिशी मारलेला ४६. विस्मृती ४७. मरण ५०. दया ५२. बिस्किटाचा पुडका ५३.सलमान खान,रेवती यांचा एक सिनेमा ५५. चांगला

### शब्दकोडे क्रमांक.२१०१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| के | श | व | सु | त | | न | गा | रा | | टो | क |
| वि | | सा | धा | | ता | | ज | ह | र | | पा |
| ल | त | | र | सो | ई | घ | र | | वि | र | ळ |
| वा | ळ | का | | व | त | न | | प्र | वा | स | |
| णा | | ज | व | ळा | | □ा | ग | | र | | छा |
| | को | ळ | सा | | मा | ट | | के | | ज्ञा | न |
| था | प | | ह | न | न | | स | व | ल | त | |
| ली | | का | त | र | | श्वा | | ल | ग | | भ |
| | धा | म | | म | क | स | □ | | ट | क | ला |
| सा | र | ना | थ | | ट | | या | क | | मी | |
| ह | क | | वा | टा | | मी | | वा | र | | घा |
| स | री | ता | | च | ल | | खो | ड | | नी | व |



# एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. टेक्सटाईल महाविद्यालयात जागतिक मातृभाषा दिन साजरा

**शिरपूर, दि.२- एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. टेक्सटाईल महाविद्यालयात जागतिक मातृभाषा दिन साजरा करण्यात आला.**

सेंटर फॉर टेक्सटाईल फंक्शन्स, शिरपूर येथे दि. फेब्रुवारी रोजी जागतिक मातृभाषा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना मातृभाषेतील विविधता आणि सांस्कृतिक वारसा तसेच विविध भाषांचे संरक्षण आणि संवर्धन यांचे महत्त्व कळावे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. यावेळी टेक्सटाईल कॉलेजचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय शिवणकर म्हणाले, आपल्या मातृभूमीने आणि पूर्वजांनी दिलेला हा अनमोल वारसा जपणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. मातृभाषा आपणास जिव्हाळा आणि आपुलकी शिकवते आणि त्यातूनच सामाजिक बांधिलकी जपण्यास मदत होते. यावेळी विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन मनोगत व्यक्त केले. रुपसिंग पावरा, रविना पावरा, लावण्या शिंपी, रुपेश पाटील, मंगेश बंजारा, देवेश पाटील यांनी आपल्या पारंपरिक भाषेत संवाद साधत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून आपल्या संस्कृती आणि परंपरे विषयी कृतज्ञता व्यक्त केली.

प्रा. प्रफुल्ल कोलते यांनी वऱ्हाडी भाषेचा इतिहास याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. तुषार शिंदे यांनी अहिराणी कविता अरे संसार संसार..जसा तवा चुल्हावर..आधी हाताला चटके.. तेव्हा मिळते भाकर..! सादर करत भावुक वातावरण तयार केले. प्रा. रणजित तुरुकमाने यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी कमिटी मेंबर्स यांचे सहकार्य लाभले.

# पर्यावरण रक्षणासाठी नो व्हेईकल डे पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद

**शहादा, दि.२ (प्रतिनिधी)- पर्यावरणाचे रक्षण त्याचबरोबर सार्वजनिक वाहतुकीचा वापर तसेच पायी चालण्याने शरीराच्या सर्वांगीन व्यायाम होतो ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी येथील शेठ व्ही.के.शहा विद्यालयातील कर्मचाऱ्यांना तसेच शक्य असल्यास विद्यार्थी व पालकांनी आठवड्यातून एक दिवस नो व्हेईकल डे साजरा करण्याचे आवाहन प्राचार्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी केले आहे.**

शहरातील कै.डॉ.विश्राम काका शैक्षणिक संकुलात सुमारे २५० हून अधिक कर्मचारी आहेत. त्याचबरोबर हजारो विद्यार्थी इतर शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना ने आण करण्यासाठी पालक वर्ग आपल्या खाजगी वाहनाने येतात. शहरात शाळेचा जवळपास वास्तव्य असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आठवड्यातून एक दिवस आपल्या पाल्याला सायकल अथवा पायी शाळेत सोडण्यास व घ्यायला आल्यास मोठ्या प्रमाणावर प्रदूषण कमी होऊन वाहतूक कोंडीही कमी होऊन पर्यावरणाचे संतुलन राहील यासाठी सर्वच घटकांनी सहकार्य करण्याचे आवाहन श्रीमती पाटील यांनी केले आहे. या उपक्रमामुळे वाहनांची संख्याही रोडावणार आहे.

प्राचार्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी केलेल्या आवाहनाला शाळेतील कर्मचाऱ्यांनी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आठवड्यातून एक दिवस नो व्हेईकल डे साजरा करण्यासही प्रारंभ झाला असून आठवड्यातून एक दिवस कर्मचारी पायी अथवा सार्वजनिक वाहनाने शाळेत हजर होतात. शहरातील वाहतूक कोंडी, प्रदूषणातील वाढ कमी करण्यासाठी नो व्हेईकल डे साजरा होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्व खासगी वाहनांना विश्रांती देऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वापरात वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी शाळेने केलेली सुरुवात ही प्रशंसनीय असल्याचे पालक वर्गाकडून सांगण्यात आले.



# खान्देश कुंभार समाजातील ऐंशी लाभार्थ्यांना खादी ग्रामोद्योगच्या माध्यमातून विद्युत चाकांचे वाटप

**धुळे, दि.२- धुळे जिल्हा खानदेश कुंभार समाज संस्थेच्या वतीने आज धुळे जिल्ह्यातील ८० लाभार्थ्यांना विद्युत चाकाचे वाटप कार्यक्रम जिल्हा परिषद कर्मचारी संघटना भवन संतोषी माता चौक या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमासाठी आमदार अनुप अग्रवाल, भाजप जिल्हा अध्यक्ष गजेंद्र अंपळकर, सरचिटणीस डॉ. सुशील महाजन, माजी महापौर प्रतिभाताई चौधरी, धुळे जिल्हा शिवसेनाचे अध्यक्ष तुळशीराम गावित, भगवान सूर्यवंशी, सौ. छायाताई बहाळकर, सोनवणे, विजय ठाकरे, भानुदास वाघ, किशोर कुंभार, रतिलाल कुंभार, भूषण कुंभार इत्यादी मान्यवरांच्या हस्ते ऐंशी लाभार्थ्यांना विद्युत चाकाचे वाटप करण्यात आले. भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या विद्यमानाने खादी ग्रामोदय सूक्ष्म व लघुउद्योग यांच्या माध्यमातून साक्री तालुका ४०, धुळे तालुका २० व धुळे शहरासाठी २० असे ८० लाभार्थ्यांना विद्युत चाक उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमासाठी जिल्हा अध्यक्ष सुरेश बहाळकर, सचिव रमेश बहाळकर, मनसुख गुजराती, ज्ञानेश्वर परदेशी, गोकुळ कुंभार, संजय बोरसे, मिलिंद कुंभार, शांताराम चव्हाण, अमोल चित्ते, विशाल चव्हाण आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# देवरे तंत्रनिकेतनमध्ये सी क्वेस्ट फूड कार्निव्हलचे आयोजन

**धुळे दि.२- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापू साहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन मध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातर्फे तृतीय वर्ष पदविका विद्यार्थ्यांसाठी सी प्रोग्रॅमिंग वर आधारित आंतरमहाविद्यालयीन सी क्वेस्ट तांत्रिक कौशल्य सादरीकरण स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देवरे तंत्रनिकेतनसह शासकीय तंत्रनिकेतन, आर. सी. पटेल तंत्रनिकेतन, नवलनगर तंत्रनिकेतन, निकम तंत्रनिकेतन, पारोळा, नासिक तंत्रनिकेतन मधील दोनशेहून अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी उत्साहाने सहभागी झाले होते.**



प्रथम सत्रात एका तासात पन्नास प्रश्न सोडवण्याचे विद्यार्थ्यांना आव्हान देण्यात आले होते त्यातील बत्तीस स्पर्धक दुसऱ्या सत्रातील संगणकावरील प्रोग्रॅमिंगच्या प्रात्यक्षिक स्पर्धेत पात्र ठरले व दुसऱ्या सत्रातील पहिले तीन विद्यार्थी पारितोषिक विजेते ठरले. देवरे तंत्रनिकेतन मधील ओम हिरेने प्रथम, ईश्वरी कढूने द्वितीय तर पार्थ सूर्यवंशीने तिसरे पारितोषिक मिळवले विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक स्मृतीचिन्हे व सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. संगणक विभाग प्रमुख प्रा.सौ.सुरेखा पाटील, प्रा.निशाद पटेल तसेच विभागातील प्रा.चैताली पाटील, प्रा.मानसी मनिखेडकर, प्रा.रेणुका धात्रक तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी कार्यक्रमाचे सुरेख आयोजन केले. तसेच तृतीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना उद्योजकता परिचय उपक्रमा अंतर्गत फूड कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. फूड कार्निव्हलला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. प्राचार्य प्रा.संजय हिरे यांच्या हस्ते दोन्ही स्पर्धांचा औपचारिक शुभारंभ झाला. याप्रसंगी विभाग प्रमुख प्रा.सौ. सुरेखा पाटील, प्रा.सुनील मुंदडा, प्रा.राजेंद्र ताथेड, प्रा.डी.एस. पाटील व विविध विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संगणक विभागाने स्पर्धेचे संयोजन केले.

# पाटील महाविद्यालयात पिरियॉडिक टेबल पोस्टर स्पर्धा उत्साहात



**साक्री, दि.२- अठ्ठाविस फेब्रुवारी १९२८ रोजी डॉ.सी.व्ही. रामन यांनी 'रमण प्रभाव'चा शोध लावला त्यांना १९३० मध्ये भौतिकशास्त्र विषयातील नोबेल पारीतोषिक मिळाले या शोधामुळे भारताला जागतिक स्तरावर एक वैज्ञानिक शक्ती म्हणून आ-ळख मिळाली हा दिवस सर रामण यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यातून प्रेरणा घेत विज्ञानाची कास धरून युवकांनी राष्ट्र विकासात योगदान द्यावे असे प्रतिपादन एम. डी.सिसोदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एस. गिरासे यांनी सी.गो. पाटील महाविद्यालयात केले.**

सी.गो. पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त रसायनशास्त्र विभाग व मराठी विज्ञान परिषद, साक्री विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पिरियॉडिक टेबल पोस्टर स्पर्धा २०२४-२५ च्या प्रसंगी प्राचार्य डॉ.गिरासे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.आर.आर. अहिरे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. सचिन नांन्द्रे संचालक, रासेयो कबचौ उमवि यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सिसोदे महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ. यू. जी. पाटील, उपप्राचार्य डॉ.ए.बी. पाटील, समन्वयक डॉ.डी. एस. चव्हाण, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिपक नगराळे, प्रा.डॉ. प्रीतम तोरावणे, डॉ.हसीनखा तडवी, प्रा.विलास पावरा व १४१ विद्यार्थी उपस्थित होते.

पिरियॉडिक टेबल पोस्टर स्पर्धेचे मूल्यमापन व पारितोषिक वितरण प्राचार्य डॉ.गिरासे आणि डॉ. नांन्द्रे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत प्रथम पारितोषिक अंजली सुतार व जानवी वाघ यांना द्वितीय पारितोषिक भूमिका बच्छाव, तिसरे पारितोषिक कुणाल सावळे, रुपेश अहिरे आणि जयेश बोरसे, प्रवीण पाटील या दोन ग्रुप मध्ये विभागून देण्यात आल. प्रास्ताविक व बक्षीस यादीचे वाचन डॉ.दिपक नगराळे यांनी, सूत्रसंचालन प्रा.एस.टी. मगर यांनी केले तर आभार प्रा.मुकेश वळवी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

अ‍ॅड.एन.पी. अयाचित प्रोफेस पेड निशाणी नं. ६

**म. दिवाणी न्यायाधिश सो.(क.स्तर) दोंडाईचा यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५२/२०२५

योगेश यादव गुरव, वगैरे ६ ....अर्जदार

।।विरूध्द।।

निरंक .... जाबदेणार

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत हे यादव तानका गुरव हे दि. १०/०३/२०२४ रोजी दोंडाईचा येथे मयत झाले त्यांचे कायदेशीर वारस १) योगेश यादव गुरव, २) विजय यादव गुरव, ३) जयवंत यादव गुरव, ४) मनोज यादव गुरव, ५) संजय यादव गुरव, ६) भारती भरत गुरव हे कायदेशीर वारस आहे म्हणून त्या संदर्भात त्यांना वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. त्या अर्थी ज्या कोणाला या बाबत हरकत असेल, अर्जदार मयताचे वारस नाहीत किंवा अर्जदारांशिवाय अन्य कोणी कायदेशीर वारस आहेत अशी माहिती असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दि. ११/०४/२०२५ चे आत मे. कोर्टात आपली लेखी किंवा तोंडी हरकत नोंदवावी. अन्यथा अर्जदार यांचे माहिती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. दि. २१/०२/२०२५

आदेशावरुन

सही:... सही...

**कामगिरी कारकुन** दिवाणी न्यायालय (क.स्तर) दोंडाईचा (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय (क.स्तर) दोंडाईचा

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. १५१ यातील मंजूर अभिन्यासाप्रमाणे प्लॉट नं. ४७ अंतीम मोजणीप्रमाणे प्लॉट नं. ५३चे एकूण क्षेत्र ९० चौ. मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस :रस्ता ९ मी., पश्चिमेस : प्लॉट नं. ४८, दक्षिणेस : प्लॉट नं. ५२, उत्तरेस : प्लॉट नं. ५४.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील बखळ प्लॉट हा श्री.संजर महादू बैसाणे, रा. घ. नं.९९, वॉर्ड नं. ४, मु. बालझिरी पो. कांसुल ता. पानसेमल जि. बडवानी (मध्यप्रदेश) यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे प्लॉट हा आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर प्लॉटवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्यूपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर वैयक्तिकपणे कागदपत्रासह कळवावी. मुदतीत हरकत अगर तक्रारी न आल्यास आमचे आशिल सदरहू प्लॉटचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या आशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०२/०३/२०२५

**अ‍ॅड.प्रमोद मुकुंदा चौधरी**

११४, गोविंदा अपार्टमेंट देवपूर धुळे.

मो. ९८६०७०६१७१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच बँक, वित्तीय संस्था, व पतपेढी यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार श्री. सुरज रतन चौधरी रा. नेहरु नगर देवपूर, धुळे ता. जि. धुळे यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली १) आशा शरद मांडे, २) अतुल शरद मांडे, ३) निकीता शरद मांडे, सर्व रा. महावीर किराणा जवळ घर नं. १५३१,/अ गल्ली नं. ४/५ पारोळा रोड, धुळे ता. जि. धुळे यांची मिळकत, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टाच, जप्ती , सौदापावती, करार, वहिवाट, मुखत्यार पत्र, कुळवहिवाट, खरेदीखत, अदलाबदल खत, मृत्यूपत्र, वारस, हक्क,बक्षिसपत्र, सिमावाद तसेच क्षेत्राबाबतचा वाद, वेचन सौदापावती करार, न्यायालयात वाद असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे तसेच निकालाची प्रत, भाडे करारनामा, कब्जा असल्यास सदर संबंधीत व्यक्तींनी खालील सही करणार यांच्याकडे सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष भेटून व कागदपत्रे दाखवून व सदर जाहीर नोटीस व सूचना मिळूनही कोणीही खालील सही करणार यांना योग्य त्या कागदपत्रांनिशी प्रत्यक्ष न भेटल्यास किंवा त्यांचे समाधान करण्यास असमर्थ ठरल्यास आमचे पक्षकार खालील परिशिष्टत नमूद मिळकत निर्वेध, निर्बोज व निजोखीमव बोजाविरहीत आहे, असे समजून खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मात्र कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास सदरची हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

मौजे वलवाडी धुळे म. न. पा. हद्दीतील सर्व्हे क्र. ५/१/अ/१/१/अ/२ पैकी प्लॉट क्र. ५४ चे क्षेत्र १७६ चौ. मी. या पैकी तुम्हास कायम खरेदी दिला. श्रीनाथ रो हाऊस मधील रो हाऊस क्र. २ चे क्षे. ५१.६४ चौ. मी. व पहिल्या मजल्याचे क्षेत्र ४१.२९ चौ. मी. दोन्ही मजल्याचे एकूण क्षेत्र ७७.९३ चौ. मी. व उर्वरित बखळ जागेसह.

ज्याच्या चतुसिमा पुढील प्रमाणे.

पु. : प्लॉट नं. ५५ प. : रो हाऊस क्र. १

उ. : ९ मी. रस्ता द. : रो हाऊस क्र. ३

सदरची जाहीर नोटीस मिळकत मालकांनी सांगितल्या वरुन व माहिती दिल्यावरुन आज रोजी आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे दि. ०२/०३/२०२५

**अ‍ॅड.चक्षुपाल आनंदा बोरसे**

प्लॉट नं. १५, गोवर्धन नगर, (सोसायटी) चावरा इंग्लीश मेडियम स्कूल जवळ, वलवाडी, धुळे ता. जि.धुळे.

मो. ९०११११०२६९

# फवारणीचे औषध प्राशन केल्याने मृत्यू

धुळे, दि.२- शिंदखेडा तालुक्यातील देवी, पोस्ट चिमठाणा येथील पंचेचाळीस वर्षीय इसमाने फवारणी साठी ठेवलेले विषारी औषध प्राशन केल्याने मृत्यू झाला आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, देवी, पोस्ट चिमठाणा येथील जगन बापू पवार (वय ४५) यांनी दि.१० जानेवारी २०२५ रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास फवारणीसाठी ठेवलेले विषारी औषध पिल्याने त्यांना त्रास होवू लागला. त्यांना दोंडाईचा उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉ.पटेल यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शिंदखेडा पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे ता. प. स. धुळे पैकी मौजे देवपूर येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. १०४ यापैकी प्लॉट नं. २३ चे एकूण क्षेत्र ४८७.७३ चौ. मी. म्हणजेच ५२५० चौ. फुट यापैकी पश्चिमेकडील भागा पैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र १६२.५३ चौ. मी. बखळ प्लॉट यास विस्तारीत सि. स. नं. ६८४९ सत्ता प्रकार क असून त्याचे एकूण क्षेत्र ४८० चौ. मी. यापैकी उत्तरे कडील भागाचे क्षेत्र १५७.५ चौ. मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : प्लॉट नं. २३ चा उर्वरित भाग पश्चिमेस : रस्ता

दक्षिणेस : प्लॉट नं. २३ चा उर्वरित भाग उत्तरेस : प्लॉट नं. ९

येणे प्रमाणे वर्णनांची मिळकत ही श्री. राम रमेश कानडे रा. धुळे यांचे मालकी व ताबे व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत त्यांनी कायम स्वरुपी खरेदी खतान विकण्याचा सौदा आमचे पक्षकारा सोबत केला असून आमचे पक्षकार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत मा. दुय्यम उपनिबंधक धुळे यांच्या कार्यालयात नोंदविणार आहे.

सबब या जाहीर नोटीसीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वर नमूद वर्णनाच्या मिळकतीबाबत नमूद मिळकत मालकांशी कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा खरेदी-विक्री, तारण, गहाणखत, सौदा, लिज, भाडेकरार, बक्षिसपत्र, जनरल अगर स्पेशल मुखत्यार इ. कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास अगर सदर व्यवहारास कोणाचीही काही हरकत व तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खाली नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासहीत लेखी स्वरुपात नोंदवाव्या. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती अगर म्हणणे न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आपचे पक्षकार खरेदीचा वव्यवहार पूर्ण करतील. तसेच वर नमूद मुदतीनंतर आलेल्या अगर परस्पर वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन घेतलेल्या हरकती आमच्या पक्षकारा वर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावे.

सदर जाहीर नोटीस आमच्या पक्षकाराने सांगितल्यावरुन आज रोजी आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे दि. २/३/२०२५

**अ‍ॅड. राहुल सुभाष शिकारे**

१५,रामचंद्र नगर, पारोळा रोड, धुळे. मो.९४२२२१७८६७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे भोकर येथील गट नं. ४३/२/ब पैकी प्लॉट नं. १ चे क्षेत्र १५७.८८ चौ. मी. प्लॉट नं. २ चे क्षेत्र १३० चौ.मी. प्लॉट नं. ३ चे क्षेत्र १५२ चौ. मी. प्लॉट नं. ४ चे क्षेत्र १७८.४० चौ. मी. प्लॉट नं. ५ चे क्षेत्र १६२.१० चौ. मी. प्लॉट नं. ६ चे क्षेत्र १३०.८२ चौ. मी., प्लॉट नं. ७ चे क्षेत्र १५० चौ. मी., प्लॉट ८ चे क्षेत्र १५० चौ. मी., प्लॉट नं. ९ चे क्षेत्र १५० चौ.मी. प्लॉट नं. १० चे क्षेत्र १७८.५० चौ. मी., प्लॉट नं. ११ चे क्षेत्र १४६ चौ. मी., प्लॉट नं. १२ चे क्षेत्र १४६ चौ. मी., प्लॉट नं. १३ चे क्षेत्र १४६ चौ. मी., प्लॉट नं. १४ चे क्षेत्र १६४.२५ चौ. मी., प्लॉट नं. १५ चे क्षेत्र १६४.२५ चौ. मी., प्लॉट नं. १६ चे क्षेत्र १४६ चौ. मी., प्लॉट नं. १७ चे क्षेत्र १४६चौ. मी., प्लॉट नं. १८ चे क्षेत्र १४६ चौ. मी., प्लॉट नं. १९ चे क्षेत्र १७८.५० चौ. मी., प्लॉट नं. २० चे क्षेत्र १६८.१५ चौ.मी., प्लॉट नं. २१ चे क्षेत्र १३८चौ. मी., प्लॉट नं. २२ चे क्षेत्र १३८ चौ. मी. प्लॉट नं. २३ चे क्षेत्र १३८ चौ.मी., प्लॉट नं. २४ चे क्षेत्र १५५.२५ चौ. मी. मात्रचे चोवीस बखळ प्लॉटस.

यासी चतु:सिमा मंजूर ले-आऊट प्रमाणे आहेत.

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **श्री.गजेंद्र दगडू नेरकर,** रा. ५७, इंद्रप्रस्थ कॉलनी, गोंदूर रोड, वलवाडी, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०२/०३/२०२५

**अ‍ॅड. रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.

मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना इत्यादी यंना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : धुळे महानगरपालिका, धुळे हद्दीतील मौजे धुळे येथील गट क्र. ४६३/३ पैकी प्लॉट नं. १६, त्यासी नगर भुमापन क्र. ६९७८ त्यासी क्षेत्र २७८.७० चौ. मी. (३००० चौ. फुट) यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : रस्ता पश्चिमेस : प्लॉट नं. ४

दक्षिणेस : प्लॉट नं. १५ उत्तरेस : रस्ता

वरील वर्णनाची मिळकत ही नामे श्रीमती पुष्पलता प्रकाश अग्रवाल आणि श्री. पवन प्रकाश अग्रवाल (बंसल) यांचे मालकीची असून सदरील मिळकत ही मागील सुमारे १६ वर्षापासून त्यांच्या मालकी व ताबे कब्जे उपभोगातील आहे. वर नमूद मिळकत ही पवन प्रकाश अग्रवाल (बंसल) व त्यांची आई नामे श्रीमती पुष्पलता प्रकाश अग्रवाल यांनी श्री. जितेंद्र गोकुळप्रसाद मुंदडा आणि गोगुळप्रसाद रामविलास मुंदडा यांचेकडून दि. ०९/०४/२००९ रोजी दालन -१-१६२८/२००९ या नोंदणीकृत खरेदीखतान्वये खरेदी घेतली होती व आहे. तेव्हापासून सदरची मिळकती पवन प्रकाश अग्रवाल (बंसल) व त्यांची आई नामे श्रीमती पुष्पलता प्रकाश अग्रवाल यांच्या प्रत्यक्ष कब्जे व ताबे उपभोगातील होती व आहे व तशी नोंद ७/१२ उताऱ्यावर देखील कब्जेदार व मालक सदरी घेण्यात आली होती. सदर मिळकतीवर खरेदीखत नोंदविल्यानंतर नामे पुष्पलता प्रकाश अग्रवाल (बंसल) यांनी धुळे महानगर पालिकेची रितसर रहिवासी प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी घेवून युनियन बँक ऑफ इंडिया (कॉर्पोरेशन बँक) यांचेकडून गृह कर्ज मिळवून घराचे बांधकाम करुन आजतागायत सदर मिळकतीवर राहत आहे.

जुलै २०२४ मध्ये श्री. पवन प्रकाश अग्रवाल (बंसल) यांना असे कळाले की, सदरील मिळकतीचा नगर भुमापन (सिटी सर्व्हे) उताऱ्यावर बेकायदेशीर रित्या प्रशांत प्रकाश अग्रवाल यांचे नाव दिसून येत आहे. म्हणून श्री. पवन प्रकाश अग्रवल (बंसल) यांनी प्रशांत प्रकाश अग्रवाल यांच्याविरुद्ध मे. न्यायालयात केस दाखल केलेले असून सदरील केस मे. न्यायालयात प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत नामे प्रशांत प्रकाश अग्रवाल आणि इतर त्रयस्त इसमांमार्फत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये केल्यास त्या व्यवहाराशी श्री. पवन प्रकाश अग्रवाल (बंसल) आणि त्यांची आई नामे श्रीमती पुष्पलता प्रकाश अग्रवाल यांचा काही एक संबंध राहणार नाही. तसेच सदरील व्यवहार त्यांचेवर बांधील राहणार नाहीत तसेच कुठल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०१/०३/२०२५

**अ‍ॅड. अशपाक एफ. शेख**

ऑफिस पत्ता : ०५, पहिला मजला, अन्सार नगर, मस्जिद कॉम्प्लेक्स, ८० फुटी रोड, तिरंगा चौक,धुळे मो. ९८२३०७८७६२

## नमुना झेड

**(नियम १०७ पोट-नियम (११(ड-१) पहा.)**

# स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

वाचावे : - मा. अप्पर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील आदेश पतसंस्था /स. आ. - ५/का. क. १५६/कै. सौ. ताईसाहेब सुनंदा गोपाळराव केले म. ना. स. पतसंस्था मर्या./ ३७१९/२०२४ दि. २७/१२/२०२४

ज्या अर्थी खाली सही केलेला, वसुली अधिकारी कै. सौ. ताईसाहेब सु. गो. केले म. ना. स. पतसंस्था मर्या,/धुळे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून खालील नमूद तारखेस थकबाकी मागणीची नोटीस ऋणको यांचे नांवासमोर नोटीशी मध्ये नमूद केलेली रक्कम व त्यावरील होणारे व्याज अशी नोटीस दिली असून संपूर्ण थकबाकीची रक्कम भरणे विषयी सूचित केलेले होते आणि ऋणको/जामीनदार याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता त्यांचे नांवासमोर नमूद तारखेस जप्ती आदेशाने जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या नंतर ताबा घेण्याची कार्यवाही केली जाईल.

विशेष करुन ऋणको/जामीनदारला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास कै. सौ. ताईसाहेब सुनंदा गोपाळराव केले म. ना. स. पतसंस्था मर्या. धुळे यांच्या बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज आणि त्यावरील व्याज याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ. नं. | मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | ताब्यात घ्यावयाची मालमत्ता |  |  | चतु:सिमा | थकबाकी नोटीस दिल्याची तारीख | रक्कम रु. | मालमत्ता जप्त केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | शिवार | भूमापन/ घर. क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | उत्तरेस)दक्षिणेस पुर्वेस/पश्चिमेस |  |  |  |
| १) | रघुनाथ रामदास चौधरी (कर्जदार चंद्रभागा रघुनाथ चौधरी) | धुळे १ ता.जि.धुळे | सि.स. नं. ३९८१ | १२२.९० | नकाशाप्रमाणे | ०८/०२/२००८ | १,५६,०९२ | २९/०५/२००८ |
| २) | डी.जी.पाटील अ‍ॅण्ड कंपनी जामीनदार विजया देविदास पाटील | बाळापूर ता.जि. धुळे | शेत गट क्र. ७३/१ ७३/२ | हे.आर. १,०६,०० १,०७,०० | नकाशाप्रमाणे | २०/११/२००८ | ४५,००,७९७ | ०८/०७/२००९ |
| ३) | विद्या वकील कुवर पाटील वगैरे दोन कल्पेश वकील कुवर भूषण वकील कुवर | वलवाडी ता. जि. धुळे | भूमापन २४/१/ अ/१/अ/ १/ब/२/६५ | चौ. मी. १.५५.०० | नकाशाप्रमाणे | २५/१०/२००७ | १,१६,४७४ | ०५/११/२००७ |
| ४) | माधवी रविंद्र काळे वगैरे १)अर्जून रविंद्र काळे २)दिपीका रविंद्र काळे | देवपूर ता.जि. धुळे | भूमापन क्र.७३४४ | चौ.मी. ४६३.१० | नकाशाप्रमाणे | ०८/०२/२००८ | ३,४२,०७१ | ३०/०७/२०१९ |
| ५) | जिभाऊ भिका पाटील रा मोघण ता. जि. धुळे कर्जदार- शोभा जिभाऊ पाटील | मोघण ता. जि. धुळे | शेती गट क्र. ३९१/२/अ पैकी हिस्सा | हे. आर. ०.३०.०० | नकाशाप्रमाणे | ०८/०२/२००८ | २,६३,१५२ | १३/०७/२०११ |
| ६) | बाबुराव कौतीक पाटील रा. वायपूर ता. शिंदखेडा जि.धुळे कर्जदार सिंधुबाई बाबुलाल पाटील | वायपूर शिंदखेडा जि. धुळे | शेती गट क्र. ४३४ | हे. आर. ०.३०.०० | नकाशाप्रमाणे | १५/१०/२००७ | १,७४,६३९ | १९/११/२०१९ |
| ७) | जगदीश नामदेव देवरे रा.म्हसदी ता. जि. धुळे कर्जदार - देवरे पुष्पा जगदिश | देऊरबु. ता.जि. धुळे | शेती गट क्र. ८५ | हे.आर. १.५२.०० | नकाशाप्रमाणे | ०५/१२/२००७ | १,२९,२८७ | फेरफार नो.२४०३ नुसार |
| ८) | कैलास झिपा पाटील रा.धाडरे ता.जि. धुळे कर्जदार - शोभा कैलास पाटील | धाडरे जि. धुळे | भूमापन क्र. गट क्र.१५५/ब | हे.आर. ०.६०.०० | नकाशाप्रमाणे | ३०/११/२००६ | ३,०३, ५०५ | २०/०९/२००७ |
| ९) | विमलबाई जगन्नाथ देवरे रा.आर्वी ता. जि.धुळे यांचा हिस्सा | आर्वी ता. जि. धुळे | गट क्र. ९४/१/क | हे.आर. ०.८१.०० | नकाशाप्रमाणे | १४/१०/२००६ | १,३९,९६६ | २९/०७/२०११ |
| १०) | जयश्री दिलीप देसले रा. खलाणे ता, शिंदखेडा जि.धुळे | खलाणे ता.शिंदखेडा जि. धुळें | भूमापन क्र. १५७/१/ब | हे. आर. २.१८.०० पो.ख.०.०१.०० २.१९.०० | नकाशाप्रमाणे | १३/०८/२००८ | १३,९७,९३ | ०४/०९/२००९ |
| ११) | सुशीलाबाई आत्माराम माळी रा. भदाणे, ता. जि. धुळे यांचा हिस्सा | भदाणे ता. जि. धुळे | गट क्र. १९५/२/अ | हे. आर. २.४८.०० | नकाशाप्रमाणे | १०/०१/२००८ | १,०८,०८५ | १६/०७/२००८ |
| १२) | कुसुम काशिनाथ देसले रा. मेहेरगांव ता. जि. धुळे यांचा हिस्सा | मेहेरगाव ता.जि. धुळे | ग. क्र. ३९५.४अ | हे. आर. ०.३९.०० पो.०.१०.०० ०.४९.०० | नकाशाप्रमाणे | ३०/११/२००६ | २,६२,५७९ | १५/०४/२०१४ |
| १३) | ध्रुपदाबाई धुडकू पाटील गोकुळ धुडकू पाटील व विजय धुडकू पाटील रा. धाडरे ता.जि.धुळे | धाडरे ता. जि.धुळे | गट क्र. १२८/१/२ | हे. आर. ०.६०.०० | नकाशाप्रमाणे | २२/०१/२०१४ | ७६,०५३ | १५/०४/२०१४ |
| १४) | सुनंदाबाई विष्णू पाटील संमतीदार -भावजी साबरा पाटील रा.मोधण ता. जि. मिळकत धारक | मोधण ता.जि. धुळे | गट क्र. ४४४ | हे. आर. १.३५.०० पैकी ०-७२ | नकाशाप्रमाणे | १६/०२/२००८ | ४,५५,३६० | ०८/०८/२०१६ |

धुळे दिनांक २४/०२/२०२५

जा.क्र. ता.१/३/२०२५

(शिक्का)

सही....

**विशेष वसुली अधिकारी**

कै. सौ.ताईसाहेब सुनंदा गोपाळराव केले महिला नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. धुळे (ग. नं. ४ बालाजी मंदिरासमोर)

**पान १ वरुन**

## विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

केली आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होत आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जाणार आहे. राज्याच्या सर्वांगिण विकासाला चालना देत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठेवले आहे. त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पातून दिसणार आहे. मात्र, अधिवेशनाच्या तोंडावर रायगड, नाशिक जिल्हा पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्या, मंत्री आस्थापनेवर खासगी सचिव, विशेष कार्य अधिकाऱ्यांच्या नेमणुकीवरून महायुतीत तणाव निर्माण झाला आहे. महायुतीतील या तणावाचा फायदा उचलत राज्यातील विविध प्रश्नावरून सरकारची कोंडी करण्याच्या तयारीत विरोधी पक्ष आहे.

नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवत दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे. या निर्णयामुळे कोकाटे यांच्या डोक्यावर आमदार अपात्रतेची टांगती तलवार आहे. शिक्षा झाल्याने काँग्रेसचे माजी मंत्री सुनील केदार यांच्या प्रमाणेच कोकाटे यांची आमदारकी रद्द करून त्यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेण्याची मागणी विरोधी पक्षाने केली आहे. अधिवेशनात विरोधकांकडून ही मागणी लावून धरली जाण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी डिसेंबरच्या अधिवेशनात सत्ताधारी भाजपचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी खात्यातील पीक विमा योजना कथित घोटाळा उघड करून खळबळ उडवून दिली होती. अधिवेशनानंतरही धस यांनी संतोष देशमुख यांची हत्या, वाल्मिक कराडच्या अटकेची मागणी आणि धनंजय मुंडे यांच्या काळात कृषी खात्यात झालेल्या कथित गैरव्यवहारांवर आवाज उठवत मुंडेंना लक्ष्य करून संघर्षाचा पवित्रा कायम ठेवला. त्यामुळे कोकाटे यांच्याप्रमाणे धनंजय मुंडे हे सुद्धा विरोधकांच्या रडारवर राहणार आहेत.

स्वारगेट अत्याचार प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असली तरी या घटनेने पुन्हा एकदा महिला सुरक्षेच्या मुद्याने उचल खाल्ली आहे. महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी आघाडी सरकारने शक्ती विधेयक मंजूर करून ते मंजुरीसाठी केंद्र सरकारला सादर केले होते. मात्र, केंद्राने या विधेयकातील तरतुदी फेटाळून लावत राज्य सरकारला विधेयक मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे शक्ती विधेयकावरूनही विरोधी पक्ष आक्रमक राहिल. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील मदत महिना दीड हजार रुपयांवरुन २ हजार १०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र आता अपात्र महिलांची छाननी करून त्यांना वगळण्यात येत आहे. आतापर्यंत पाच लाखाहून अधिक बहिणी अपात्र ठरल्या आहेत. या मुद्द्यावरून सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी विरोधी पक्षाने ठेवली आहे.

**विरोधी पक्षनेतेपदावरून महाविकास आघाडीत बेबनाव**

विधानसभेच्या विरोधी पक्ष नेतेतपदावर दावा करण्याचा निर्णय उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने घेतला आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडेच असताना विधानसभेतही आमच्याकडेच हे पद राहील असे परस्पर जाहीर केल्याने महाविकास आघाडीत नाराजी आहे. विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ज्या पक्षाची संख्या जास्त त्या पक्षाचा विरोधी पक्षनेता होतो आणि आमचे सर्वाधिक २० आमदार आहेत. त्यामुळे आम्ही दावा करणार असल्याचे दानवे यांनी सांगितले. तर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद ठाकरे गटाकडे आहे. त्यामुळे विधानसभेतील विरोधीपक्षनेतेपद काँग्रेसला दिले जावे, अशी काँग्रेसची मागणी आहे. १० टक्के आमदार कोणत्याही पक्षाकडे नाहीत. शिवसेनेचे २० तर काँग्रेसचे १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे १० आमदार आहेत. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद ठाकरे गटाकडे आहे. परिषदेत त्यांचे केवळ ३ सदस्य आहेत. तर काँग्रेसचे ७ सदस्य आहेत. त्यामुळे विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद ठाकरेसेनेला हवे असेल तर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद सोडा अशी काँग्रेसची भूमिका आहे. शिवसेनेने तडजोडीला नकार दिला तर महाविकास आघाडीत पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

## ना.रक्षा खडसेंच्या मुलीची छेडछाड

यात्रेनिमित्त कोथळी विविध कार्यक्रम पार पडतात. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांची कन्या या यात्रेत फराळ वाटप करत होती. यावेळी भोई नावाचा तरुण तिचा पाठलाग करत होता. त्यानंतर रक्षा खडसे यांची कन्या यात्रेमध्ये सायंकाळच्या वेळेस मैत्रिणीबरोबर फिरायला गेली असता भोई नावाच्या तरुणासह काही टवाळखोरांनी तिचा पाठलाग केला. ती ज्या पाळण्यामध्ये बसत होती, त्या पाळण्यामध्ये सुद्धा तरुण बसला. त्यानंतर काही व्हिडिओ चित्रित केले. ही बाब सुरक्षा रक्षकाच्या लक्षात येताच त्यांनी त्याला मज्जाव केला. परंतु टवाळखोरांनी सुरक्षारक्षकाशी झटापट केली. यानंतर टवाळखोर तरुणांना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी रक्षा खडसे चांगल्याच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

टवाळखोर व छेडखानी करूनही तरुण मोकाट असल्याने रक्षा खडसे यांनी पोलिसांना जाब विचारला. यानंतर अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून मुक्ताईनगर पोलिसात अनिकेत भोई, पियुष मोरे, सोम कोळी, अनुज पाटील, सचिन पालवे, नितीन कोळी, किरण माळी अशा सात जणांवर ३५४, पोस्को, आयटी ॲक्ट ६६ (इ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस प्रशासन करीत आहे. दरम्यान या घटनेमुळे टवाळखोर मुलांवर आळा बसण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास

पुनर्लेखन करणे, तसेच जुन्या दस्तऐवजाचे डिजिटायझेजन करणे, जैन साधुसंतांच्या विहारांमध्ये सुरक्षा पुरवणे आणि त्यांच्या विहारांमध्ये ज्या ठिकाणी सुविधा नाहीत अशा सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सुद्धा सरकारने महामंडळाच्या माध्यमातून दिली आहे. महामंडळाच्या माध्यमातून गृहकर्जाची, विधवा महिलांना पेन्शन देणे अशा प्रकारचे सर्व समावेशक तरतुदी असलेलं व जैन समाजाच्या सर्व घटकांचा विकास करता येईल अशा सर्व योजनांचा समावेश असलेलं महामंडळ राज्य सरकारने स्थापन केले आहे. या महामंडळाची माहिती प्रत्येक जिल्ह्यातील जैन समाजाच्या सर्व समाजापर्यत पोहचावावी, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रमांत पायाभूत सुविधा विकसित करावी. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत जैन समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह उभारणीसाठी प्रशासनाने जागा उपलब्ध करुन द्यावी. तसेच जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ तसेच राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या कार्यालयासाठी तसेच समाजभवन, ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. अल्पसंख्याक समिती गठीत करण्यात यावी. या समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात याव्यात. जैन तीर्थक्षेत्र बळसाणे तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करावा. बळसाणे ते धुळे दरम्यान जैन साध्वीसाठी विहार धाम तयार करण्यासाठी योग्य जागेची निवड करावी. तीर्थक्षेत्र बळसाणेला ब वर्ग तीथक्षेत्राचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव सादर करावा. भगवान महावीर जयंतीच्या दिवशी मटन मार्केट बंद राहतील याची प्रशासनाने दखल घ्यावी. उघड्यावर मांस विक्री करणा-यांवर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी आढावा बैठकीत दिल्यात.

यावेळी महाराष्ट्र शासनाने आयोजित भगवान महावीर यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भगवान महावीर यांचे जीवन, सिद्धांत व संदेश या विषयावर घेण्यात आलेल्या इयत्ता ५ ते १० वी च्या दोन गटातील १० विद्यार्थ्यांना धनादेश तसेच प्रशस्तीपत्रक देण्यात आले. यानंतर त्यांच्या हस्ते जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयाचे उद्धाटन करण्यात आले. या पुरस्कार वितरण कार्यक्रमास मोठया संख्येने नागरिक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी कृष्णा आंधळे तीन महिन्यांपासून फरार आहे. प्रशांत कोरटकर हा मस्ती आलेला व्यक्ती इंद्रजित सावंत यांना धमकी देतो. प्रशांत कोरटकरला सरकार संरक्षण देते. कोरटकरला बेड्या घालून तुरुंगात टाकायला हवे. राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल काय-काय भूमिका व्यक्त केली. आता सरकारने सांस्कृतिक विभागामार्फत फिल्म सिटी समितीत राहुल सोलापूरकरचा समावेश केला आहे. कोश्यारींनी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला होता. हीच परंपरा हे लोक सुरू ठेवत आहेत. त्याला सरकार संरक्षण देत आहे. ३०० कोटींचा कृषी विभागात घोटाळा झाला आहे. आरोग्य विभागातील कंत्राटाला आणि एसटीच्या १३१० बसेसला मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली आहे. याचाच अर्थ आधीचे सरकार भ्रष्टाचारी होते. त्यावर सरकार पांघरूण घालण्याचे काम करत आहे, असा आरोप दानवेंनी केला.

## इन्शाअल्लाह कादंबरी अभिवाचनास..

यावेळी दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून प्रारंभ करण्यात आला. अभिवाचनापूर्वी कादंबरीचा मूळ उद्देश लेखक अभिराम भडकमकर यांनी स्पष्ट केला. कादंबरीचे अभिवाचन स्वाती चिटणीस, सचिन सुरेश, सलीम मुल्ला यांनी अत्यंत भारदस्त व समर्पक शब्दांमध्ये सादर केले. समाजातील खास करून मुस्लिम समाजातील धार्मिक घुसळणीवर आधारित या कादंबरीत परिवर्तनवादी युवक व महिलांच्या मनातील वादळ व त्यांना राष्ट्रीय प्रवाहात येण्यासाठी धार्मिक चिकित्सा व सुधारण्याची गरज यावर भाष्य करण्यात आले आहे. ही कादंबरी राजहंस प्रकाशनाने तीन वर्षांपूर्वी प्रकाशित केली असून आता तिसरी आवृत्ती निघाली आहे. कादंबरी अभिवाचनाचा अठरावा कार्यक्रम नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे घेण्यात आला. यापूर्वी पुणे, मुंबई, नाशिक, सोलापूर आदी ठिकाणी अभिवाचन करण्यात आले असल्याची माहिती लेखक अभिराम भडकमकर यांनी दिली. अभिवाचनानंतर उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. यावेळी माजी नगरसेवक लक्ष्मणराव कदम, डॉ.कांतीलाल टाटिया, रवींद्र जमादार, अँड.गोविंद पाटील, अरुण राठोड प्रा.आर.टी. पाटील, डॉ.योगेश चौधरी, संजय कुलकर्णी, अँड.जसराज संचेती, ज्ञानेश्वर चौधरी, प्रा.शरद पाटील, प्राचार्य डॉ.विश्वासराव पाटील, डॉ.आर.एस. पाटील, मानक चौधरी, ज्ञानी कुलकर्णी, आरिफ पिंजारी, किशन चौधरी, सतीश जव्हेरी, अँड.प्रीतम निकम, मोहन फणसे, रोहनकुमार माळी, रवींद्र रावल, मोतीशेठ जैन, कल्पेश पटेल, अनिल कुवर, सौरभ जागीरदार, ललित छाजेड, यशवंत पाटील, प्रा.मेहमूद खाटीक, विष्णू जोंधळे, चंद्रकांत शिवदे, हिरालाल रोकडे, रुपेश जाधव, सलाउद्दीन लोहार, डॉ.अनिल साळुंखे, राजेंद्र अग्रवाल, दुर्गा पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे समन्वयक प्रा.मकरंद पाटील, संचालक मयूरभाई पाटील, प्राचार्य डॉ.एम.के.पटेल यांच्यासह विविध ज्ञानशाखांच्या प्राचार्यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.विजयप्रकाश शर्मा यांनी केले.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत..

(शिरपुर) यांनी धुळे जिल्ह्यातील सर्व ५ टोलनाक्यांवर स्थानिकांना टोलमाफी मिळावी, पतसंस्थेतील थकित पैसे ठेवीदारांना मिळावेत असे निवेदन दिले.


शेतकरी प्रतिनिधी प्रविण प्रकाश पाटील (धनुर) यांनी ऑनलाईन अर्ज करुनही पशुपालक दुधाळ गायी, म्हशींचे वाटप योजने पासुन वंचित आहेत, कुसुम सौर योजनेतील लाभार्थींना साहित्य त्वरीत मिळावे, अशी मागणी केली. माजी प्राचार्य बी.एम.भामरे, रितेश मनोहर परदेशी (कुसुंबा), ॲड निखिल संदिपठाकरे (मोराणे) आदींनीं विविध सूचना मांडल्या. आभार अर्चना भगत यांनी मानलेत. याशिवाय अशासकिय सदस्य प्रशांत पाकळे (लामकानी), जगदिश बोरसे (सरवड), शिवनाथ कासार (सोनगीर) तर शासकिय सदस्य पोलीस अधिक्षक विभागतर्फे चंद्रकांत खोंडे, जिल्हा माहिती विभागतर्फे संदिप गावित, जिल्हापुरवठा लिपिक जी.डी. पिंगळे, दुरसंचारचे प्रतिनिधी आत्माराम शिंदे आदी सदस्य उपस्थित होते.

## छत्रपतींची बदनामीकारक पोष्ट

करण्यात आली आहे. सद्या छावा सिनेमा प्रदर्शित झाला आहे.या छावा सिनेमावरुन रोज वेगवेगळ्या पोष्ट व्हायरल होत आहेत. त्यात दोन समाजात तेढ निर्माण होईल, अशा प्रतिक्रीया व्यक्त होत असल्याने ठिकठीकाणी तेढ निर्माण होत आहेत.

## धुळे सीए शाखेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे यशस्वी आयोजन; उपक्रमाचे कौतूक

**धुळे दि.२- सध्याच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे क्षेत्र वेगाने विकसित होत असून त्याचा उपयोग विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, धुळे सिए शाखेच्या वतीने नुकतेच पंचवीस ते सत्तावीस फेब्रुवारी रोजी लेव्हल-१ प्रमाणपत्र अभ्यासक्रम आर्टिफिशियल इंटेलिजन्स आयोजित करण्यात आला. हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पार पडला.**




या उपक्रमाच्या माध्यमातून धुळे सीए शाखा सदस्यांना एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून त्यांच्या प्रॅक्टिसमध्ये कार्यक्षमता व उत्पादकता कशी वाढवता येईल याचे सखोल मार्गदर्शन देण्यात आले. या अभ्यासक्रमात सीए केदार पांडे, सीए रामाजयम आणि सीए राहुल धारणे यांनी एआय तंत्रज्ञानाचे सखोल प्रशिक्षण दिले. विशेषत: सीए रामाजयम हे आयसीएआयद्वारे आयोजित अखिल भारतीय एआय हॅकाथॉनचे विजेते असून, त्यांनी त्यांच्या विशेष ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग करून सीए प्रॅक्टिसमध्ये एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल मार्गदर्शन केले. एआयच्या मदतीने सीए व्यवसाय अधिक प्रभावी आणि कार्यक्षम कसा करता येईल, याबाबत सखोल मार्गदर्शन व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देण्यात आली. या अभ्यासक्रमाच्या दरम्यान, सीए संजय खैरनार, सीए अजय भतवाल आणि सीए शंकर रिजवानी यांच्या हस्ते मार्गदर्शक तज्ज्ञांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एआय व आयसीएआय कमिटीचे अध्यक्ष सीए दयानिवास शर्मा आणि उपाध्यक्ष सीए उमेश शर्मा यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या अभ्यासक्रमाला धुळे शाखा सीए सदस्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच धुळे, साक्री, नंदुरबार, शिरपूर, मालेगाव, पाचोरा, अमळनेर येथील साठ सीए सदस्य सहभागी झाले होते. सहभागी सदस्यांनी एआय तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्याचा उपयोग त्यांच्या व्यवसायात कसा करता येईल, याबाबत नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची संधी मिळाली.

धुळे सीए शाखेच्या वतीने भविष्यातही अशा आधुनिक तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात येईल, जेणेकरून सीए समुदाय अधिक सक्षम व डिजिटल परिवर्तनास सुसंगत राहू शकेल. या संदर्भात धुळे सीए शाखेचे अध्यक्ष सीए सागर गर्ग, तसेच उपाध्यक्ष आणि सचिव सीए यश आंचलिया यांनी माहिती दिली. सीए व्यवसाय अधिक आधुनिक, उत्पादक आणि प्रभावी करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

**निधन वार्ता**

## विजयजी कोशिसा

धुळे, दि.२- येथील रहिवासी राणा समाज बांधव राणा विजयजी जगन्नाथजी कोशिसा (धुळे राणा राजपूत समाजाचे पूर्व अध्यक्ष) यांचे आज रविवार दि.२ रोजी दुपारी २.४५ वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी दि.३ रोजी सकाळी ८.३० वाजता राहत्या घरापासून निघेल. देवपूर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार केले जातील. संजय कोशिसा यांचे ते बंधू तर हेमंत कोशिसा यांचे वडिल होत.



## नकाणेरोडची दुरावस्था

धुळे- नकाणेरोडचे डांबरीकरण झाल्यानंतरही तो पुन्हा ठिकठिकाणी खोदण्यात आल्याने रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर खडी पसरली असल्याने दररोज लहान मोठे अपघात घडत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

**घर विकणे आहे**

प्लॉट नं.२१, सुशिलनगर, नवजीवन ब्लड बँकेच्या मागे, चितोडरोड धुळे येथील १६५० स्के.फूट पूर्व-पश्चिम घर (४ रुम, संडास बाथरुमसह) स्वतंत्र विहीर असलेले घर विकणे आहे

-: संपर्क :-

9028718043
9356555683

**भरती**

सरकारद्वारा रजिस्टर कंपनीत मुला-मुलींची डायरेक्ट भरती!
पात्रता : १० वी ते पदवीधर व १८ ते २८ वर्षे.
पगार ७००० च्या पुढे! राहणे+जेवण फ्री
(ग्रामीणांना प्राधान्य)
पत्ता : वाडीभोकर रोड, धुळे
फोन : 8469268899

**पाहिजेत**

DTP opretor कॉम्प्युटरचे ज्ञान व कोरल software ची माहिती असलेली व्यक्ती पाहिजे. Bio Data व पगाराची अपेक्षेसह समक्ष भेटणे!
जिनेश कमलेश गांधी
गांधी किचन्स,
c/o भारत ऑटो कॉर्पोरेशन, पारोळा रोड, प्रकाश सिनेमा समोर, धुळे

**पाहिजेत**

१) हायवा ड्रायव्हर- ३
२) कार (पिकअप) ड्रायव्हर- ४
वरील पदे ही कन्स्ट्रक्शन कंपनीकरिता पाहिजे. अनुभवी व निर्व्यसनी लोकांनी भेटावे!
-: संपर्क :-
संजय पाटील
पारोळारोड, चारभुजा मार्बल जवळ, धुळे
9765552556

**विकणे आहे**

१) किया सॅलटॉस (२०२२) ॲटोमेटीक पेट्रोल
२) I 10 निऑन २०२२ पेट्रोल 17000 km. चाललेली
सर्व प्रकारचे वाहन खरेदी व विक्रीसाठी भेटा!
-: संपर्क:-
9765866999

**पाहिजेत**

मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
बॅक ऑफीस/रिसेप्शनिस्ट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १२००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

**पाहिजेत**

१) टॅली ऑपरेटर - ०१ २) सेल्समन - ०१
बाहेरगावी फिरस्ती कामाकरिता
३) हेल्पर - ०२
अर्जासह समक्ष भेटा! स.११ ते १, संध्या.५ ते ७
अशोका केमिकल वर्क्स
ई-५७/१, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे

**पाहिजेत**

होजिअरी दुकानासाठी होतकरु माणसे पाहिजेत.
हेल्पर-३, सेल्समन-१
वय २० ते ३० पर्यंत
मोहनलाल दामोदरलाल
जैन मंदिरासमोर, ग.नं.२, धुळे
9422287153
9404891061

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**

येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड
भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**

फोटोशॉप/व्हिडीओ एडिटींग/न्यूज रिडर/ व्हिडीओग्राफी/प्रॉडक्ट फोटोग्राफी, पार्टटाईम/ फुलटाईम/Tally operator
माता हिंगलाज न्यूज चॅनल
ग.नं.४, धुळे
7030966995
9422286386

**घर विकणे आहे**

चार मजली (RCC) उत्तरमुखी सदर बाजार पेठेतील घर 16x24
ग.नं.२, धुळे
-: संपर्क :-
9422788390

**शेती विकणे आहे**

मोघण शिवारातील ३ एकर बागायती शेती योग्य दरात विकणे आहे
-: संपर्क :-
9420851253

**शेती विकणे आहे**

वारुड, कमखेडा शिवारातील (शिंदखेडा तालुका) शेती विकणे आहे. (विहीरी सहीत)
-: संपर्क :-
9209915299

**विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे. शिव बसंत अपार्टमेंट, दिप आरती पेट्रोल पंपमागे, मोहाडीरोड, धुळे
-: संपर्क :-
9921694016

**- पाहिजेत -**

• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**पाहिजेत**

रेडीमेड दुकानासाठी अनुभवी सेल्समन, हेल्पर, अल्टर कामासाठी टेलर पाहिजे.
सेलिब्रेशन मेन्स वेअर
आग्रारोड, धुलिया
9421525774




**फ्लॅट भाड्याने देणे**

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. अग्रवाल नगर, भारत नर्सरी जवळ, धुळे
-: संपर्क :-
9421799330

**पाहिजे**

दुकान कामासाठी हेल्पर व अकाऊन्टंट पाहिजे
श्री स्वामी समर्थ ग्लास
देवपूर, धुळे
9767072916

**पाहिजे**

Tally operator पाहिजे. पुर्णवेळ समक्ष भेटावे!
-: संपर्क :-
9423193249

**प्लॉट विकणे**

अग्रवाल नगर, वल्लभ नगर, महावीर सोसायटी, विशाल नगर येथील लहान मोठे प्लॉट विकणे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**ऑफिस भाड्याने देणे**

गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**CVKM जवळ प्लॉट विकणे**

एसव्हीकेएम शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०